www.pudhari.com
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

5th December 2011

# देवसाहेबांचा पुण्याशी ऋणानुबंध...
# आता फक्त आठवणीच!

## चिरतारुण्याचे रहस्य 'एफटीआयआय'मध्ये उलगडले

'वय वाढले म्हणून मी स्वत:ला वयस्कर समजत नाही. फक्त माझे विचार परिपक्व झाले आहेत. मी स्वत:ला आयुष्याच्या वाटचालीतील एक प्रवासी मानतो. आयुष्याच्या प्रवासात जे काही अनुभव येतात ते मी टिपतो आणि यातूनच नवनिर्मिती होते. आपल्या बुद्धीचा पुरेपूर वापर करा आणि करमणूक क्षेत्राचे जागतिक पातळीवर नेतृत्व करण्याचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवा. तुमच्याकडे कर्तृत्व असेल तर रातोरात 'स्टार' होण्याची ताकद या क्षेत्रात आहे. प्रयत्न करा, यश नक्कीच मिळेल,'' असा अमूल्य सल्ला देव आनंद यांनी फिल्म अॅण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (एफटीआयआय)च्या गोल्डन ज्युबिली कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी दिला होता.